# विष्णुसहस्त्रनाम...२

हेमाडपंतांनी विष्णुसहस्त्रनामाचे महत्त्व बाबांच्या मुखातून आलेले २७ व्या अध्यायात वर्णन केलेले आहे. त्यापासूनच आपणही सुरुवात करू या. बाबा शामाला सांगतात –

शामा ही पोथी कनी। पाहे पहा बहुगुणी।
म्हणोनि देतो तुजलागोनि। तीं त्वा वाचूनि पहावी।।७४।।
एकदा मज उपजली नड। काळीज करू लागले धडधड।
झाली जीवाची चडफड। दिसे न धडगत माझी मज।।७५।।
ऐसिया त्या प्रसंगाला। काय सांगू शामा मी तुजला।
या पोथीचा जो उपयोग झाला। हा जीव तरला तिचे नी।।७६।।
क्षणैक उरी विसावा दिला। तात्काळ हा जीव गार झाला।
अल्लाच वाटे पोटी उतरला। जीव हा जगला तिचेनी।।७७।।
म्हणानि शामा ही तुजला नेई। ओजे ओजे वाचीत जाई।
रोज एकादे अक्षर घेई। आनंददायी ही मोठी।।७८।।

बाबांनी वर्णन केलेली स्थिती ही सर्वसामान्य प्रत्येक माणसाची होत असते वेळप्रसंग सांगून येत नसतात. पण आली की तोंड देणे हे प्रत्येकाचेच काम आहे. परिस्थितीतून मार्ग काढणे हे जमेलच असे नसल्याने माणसाने पूर्वतयारी करून ठेवावी लागते. त्या तयारीने, अभ्यासाने मन तयार होऊन आल्याप्रसंगी किंचित् काळ गडबडले तरी त्यातून बाबांच्या कृपेने 'मार्ग सापडेल, निभावून जाईल' असा आत्मविश्वास निर्माण होऊन मनुष्य सावरला जातो. संस्कारांचे हे अनमोल महत्त्व बाबांनी या प्रसंगातून सांगितले व शामाची प्रगति घडवून आणली. आमच्या पुढेही आदर्श ठेवून दिला.

## नामाचे महत्त्व

मनुष्य जीवनाची सार्थकता अनादि काळापासून ऋषी-मुनींपासून संतांपर्यंत वर्णन केलेली आहे. त्याचा मार्ग सांगितला आहे. अर्थात काळ पालटतो तसे मार्गही निष्प्रभ होतात. त्यांचे महत्त्व कमी होते, त्याचा परिणाम व्हावा तसा होत नाही. याचे उदाहरण द्यायचे झाल्यास वेदकालीन यज्ञसंस्थेचे देता येईल. 'ज्योतिष्टोमेन स्वर्गकामो यजेत' स्वर्गाची इच्छा पूर्ण होण्याकरिता 'ज्योतिष्टोम नावाचा यज्ञ करावा' असे वेदांनी

सांगितले. पण काळाच्या ओघात यज्ञसंस्थेचे मूळ स्वरूप मागे पडले तरी पण स्वर्गाची कामना कायम आहे. अशी अनेक साधने शोधून जाणत्यांनी ती सर्वसामान्यांना दिली. बुद्धांनेही सत्य, अहिंसा, करुणा, दया इत्यादि अष्टमार्ग सांगितले, पण काळाच्या ओघात त्याचाही प्रभाव कमी झाला. काळ पालटेल तशी साधनेही बदलतात. काळ हा कोणाच्या हातात नाहीं. तो घडविण्याचे वा त्याला प्रवाहित करण्याचे कार्य युगपुरुष करीत असतात. गेली अनेक शतके साधुसंतांनी सोपा म्हणून नामस्मरणाचा मार्ग सांगितला. इतर साधनांत असलेल्या मर्यादा या साधनात नाहीं. हे सर्वांना आबाल-वृद्ध, स्त्री-पुरुष, उच्च-नीच, भोळे-भाबडे इत्यादि सर्वांना खुले असलेले सुलभ व सोपे साधन बाबांनी शामाच्या रूपाने परत आपणा सर्वांच्या नजरेस आणले. विष्णुसहस्रनाम हे त्यातलेच एक – हेमाडपंत बाबांनी वर्तविलेले नाम संकीर्तनाचे महत्त्व विशद करीत आहेत –

माझा शामा असेल खुळा। परि मजला तयाचा लळा।
लोभ लावी जीवा आगळा। तयाचा कळवळा मज मोठा॥८३॥
ही विष्णुसहस्रनाममाळा। बांधीन स्वहस्ते तयाचे गळा।
करीन तया भवदु:खावेगळा। लावीन चाळा वाणीला॥८४॥
नाम पापाचे पर्वत फेडी। नाम देहाचे बंधन तोडी।
नाम दुर्वासनेच्या कोडी। समूळ दवडी लोटूनी॥८५॥
नाम काळाची मान मोडी। चुकवी जन्ममरण ओढी।
ऐसिया सहस्रनामाची जोडी। शाम्यास गोडी लावावी॥८६॥
नाम प्रयत्ने घेता चोखट। अप्रयत्नेही नाही ओखट।
मुखासि आले जरी अवचट। प्रभाव प्रकट करील॥८७॥
नामापरीस सोपे आन। अंत:शुद्धीस नाही साधन।
नाम जिव्हेचे भूषण। नाम पोषण परमार्था॥८८॥
नाम घ्यावया नलगे स्नान। नामासि नाही विधिविधान।
नामे सकळपापनिर्दाळण। नाम पावन सर्वदा॥८९॥
अखण्ड माझेहीं नाम घेता। बेडा पार होईल तत्त्वता।
नलगे काही इतर साधनता। मोक्ष हाता चढेल॥९०।
जया माझे नामाची घोकणी। झालीच तयाचे पापाची धुणी।
तो मज गुणियाहूनि गुणी। जया गुणगुणी मन्नामी॥९१॥

वास्तविक शामा नको नको म्हणत होता. पण बाबांनी ही पोथी त्याच्या हाती ळेच दिली. शामात व आमच्यात तसा कांहीं फरक आहे कां? अंतर्मुख होऊन

विचार केला तर आम्ही शामापासूनही खूप दूर आहोत. शामा भाग्यवान. त्याला बाबांचा प्रत्यक्ष सहवास लाभला. आमचे काय ? या प्रश्नाचे उत्तर हेमाडपंतांनी बाबांच्या शब्दात देऊन ठेवले आहे. त्याचे अनुकरण करणे एवढेच आमच्या हाती आहे.

अशा या सहस्रनामावर श्रीमद् आद्य शंकराचार्यांनी विस्तृत टीका लिहिलेली आहे. त्याचा आधार घेऊन ही सहस्रनामावली सुरु करीत आहोत–

**वैशम्पायन उवाच -**

**श्रुत्वा धर्मानशेषेण पावनानि च सर्वशः ।**
**युधिष्ठिरः शान्तनवं पुनरेवाभ्यभाषत ।।१।।**

(मूळ संस्कृत श्लोक वाचतांना अडचण पडू नये म्हणून, त्यांतील शब्द स्वतंत्रपणे देत आहोत. त्याला 'पदच्छेद' हे तांत्रिक नाव आहे. त्याकरिता 'पद' हे संक्षिप्त नाव वापरण्यात येईल व मूळ श्लोकातील शब्द अलग करून देण्यात येतील.)

पद – श्रुत्वा, धर्मान, अशेषेण, पावनानि, च, सर्वशः।
युधिष्ठिरः, शान्तनवम्, पुनः, एव, अभ्यभाषत ।।

अर्थ – सर्वप्रकारचे पवित्र धर्मविषय ऐकल्यावर शंतनुपुत्र भीष्माला युधिष्ठिराने पुन्हा एकदा प्रश्न केला.

महाभारत हा वैशम्पायन व जनमेजय यांच्यातील संवाद आहे. वैशम्पायन या अध्यायांतील प्रसंगाची सुरुवात करीत आहे. विष्णुसहस्रनामाचा अध्याय महाभारताच्या 'अनुशासन' पर्वात आलेला आहे.

(क्रमशः)


---

**आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा। मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य ।।**
**मच्छिंद्राने बोध गोरक्षासि केला। गोरक्ष बोळला गयनीप्रती ।।**
**गयनीप्रसादे निवृत्ति दातार। ज्ञानदेवा सारचोजविले ।।**

**- संत ज्ञानेश्वर महाराज**

# जुलै १९९० - विशेष

| तारीख | वार | | विशेष |
|---|---|---|---|
| १ | रविवार | – | मेला शरिक भगवति (काश्मीर) |
| ३ | मंगळवार | – | शयनी एकादशी-पंढरपूर यात्रा, चातुर्मास्यारम्भ, विष्णुशयनोत्सव |
| ४ | बुधवार | – | वामनपूजा, शाकव्रतारम्भ, बकरी ईद (इदुल शुआ) |
| ५ | गुरुवार | – | प्रदोष, जयापार्वतीव्रत |
| ६ | शुक्रवार | – | सूर्याचा पुनर्वसुनक्षत्रात प्रवेश |
| ७ | शनिवार | – | गुरुपौर्णिमा, व्यासपूजा, शिवशयनोत्सव, मन्वादि |
| ९ | सोमवार | – | लो. टिळक पुण्यतिथि |
| ११ | बुधवार | – | संकष्ट चतुर्थी |
| १३ | शुक्रवार | – | नागपूजा (बंगाल) |
| १५ | रविवार | – | कालाष्टमी |
| १६ | सोमवार | – | सूर्याचा कर्कराशीत प्रवेश, दक्षिणायनास सुरुवात |
| १७ | मंगळवार | – | करि-दिन |
| १८ | बुधवार | – | कामिका एकादशी, आळंदी यात्रा |
| १९ | गुरुवार | – | प्रदोष, सूर्याचा पुष्यनक्षत्रात प्रवेश |
| २० | शुक्रवार | – | शिवरात्रि, गुरुचा कर्कराशीत प्रवेश |
| २१ | शनिवार | – | दर्श अमावास्या, दीपपूजा |
| २३ | सोमवार | – | भारतीय व चांद्र श्रावण महिना प्रारंभ, नक्तव्रतारम्भ, शिवामूठ (तांदुळ) |
| २४ | मंगळवार | – | मंगळागौरी व्रतारम्भ, मोहरम, हिजरी वर्ष १४११ प्रारंभ |
| २५ | बुधवार | – | विनायक-वरद-नाग चतुर्थी, बुधपूजन |
| २६ | गुरुवार | – | नागपंचमी, उपाकर्म, बृहस्पतिपूजन |
| २७ | शुक्रवार | – | श्रियाळ षष्ठी, संपत शुक्रवार, गौरीस्थापना |
| २८ | शनिवार | – | शीतला सप्तमी, अश्वत्थमारुतिपूजन, गोस्वामी तुलसीदास जयंती |
| ३० | सोमवार | – | दुर्गाष्टमी |



# ऑगष्ट १९९० - विशेष

| तारीख | वार | विशेष |
|---|---|---|
| १ | बुधवार | – झुलन यात्रारम्भ |
| २ | गुरुवार | – पुत्रदा एकादशी, मोहरम, सूर्याचा आश्लेषानक्षत्रप्रवेश |
| ३ | शुक्रवार | – प्रदोष, शाकव्रतसमाप्ति, दधिव्रतारम्भ, वरदमहालक्ष्मीव्रत |
| ६ | सोमवार | – नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, झुलनयात्रा, अमरनाथयात्रा, अवनी अवित्तम, बलभद्रपूजा, सोलोनो (दिल्ली) चंद्रग्रहण, शिवमुष्टि (मूग), हयग्रीवोत्पत्ति |
| ७ | मंगळवार | – करिदिन |
| ९ | गुरुवार | – बहुला-संकष्ट चतुर्थी, अगस्तीउदय |
| १३ | सोमवार | – जन्माष्टमी, श्रीकृष्णजन्मोत्सव, शिवमुष्टि (सातु) |
| १४ | मंगळवार | – वैष्णवजन्माष्टमी, नन्दोत्सव |
| १५ | बुधवार | – स्वातंत्र्य दिन |
| १६ | गुरुवार | – अजा एकादशी, सूर्याचा मघानक्षत्र व सिंहराशि प्रवेश |
| १७ | शुक्रवार | – पर्युषण पर्वारम्भ (चतुर्थी पक्ष), मानसपूजासमाप्ति (बंगाल) सिंहादि (केरळ) |
| १८ | शनिवार | – पर्युषण पर्वारम्भ (पंचमी पक्ष), कैलासयात्रा, शनिप्रदोष, शिवरात्रि |
| १९ | रविवार | – अघोरा चतुर्दशी |
| २० | सोमवार | – दर्श-सोमवती-पिठोरी अमावास्या, पोळा, कुशग्रहण, शिवमुष्टि (गहू) |
| २१ | मंगळवार | – गाथा गहम्बर (पारसी), भाद्रपद, नक्तव्रतसमाप्ति |
| २३ | गुरुवार | – भारतीय भाद्रपद, सफर, हरितालिका, वराहजयंती, सामश्रावणी |
| २४ | शुक्रवार | – गणेशचतुर्थी, संवत्सरी, पारशी नूतनवर्ष १३६० |
| २५ | शनिवार | – संवत्सरी (पंचमीपक्ष), ऋषीपंचमी, मेलापाट (काश्मीर) |
| २६ | रविवार | – सूर्यषष्ठी, स्कंददर्शन |
| २८ | मंगळवार | – दुर्गाष्टमी, दुर्वाष्टमी, गौरी आणणे |
| २९ | बुधवार | – गौरीपूजन, खोरदाद साल, अदु:ख नवमी |
| ३० | गुरुवार | – गौरी-गणपति विसर्जन, भागवतसप्ताहप्रारंभ, रवि पूर्वानक्षत्रप्रवेश |



आषाढी एकादशी - ३.७.१९९०

Licence to Post Without Prepay
at Dadar Head Office, Bombay
Regd.: No. MH/BY
LICENCE N

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुसाक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः ॥





मुद्रक: श्री. एम. डी. राजन, गीता ऑफसेट, बी-२३, रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट, नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.
**संपादक व प्रकाशक:** कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी, साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४.

ऑगष्ट १९९०) (किंमत २ रु.

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक





श्री गणश चतुर्थी - २४.८.१९९०



# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक
श्री साईबाबांच्या
दिव्य संदेशाचा प्रसार


१ वे) ऑगष्ट १९९० (अंक ५ वा

भारतीय श्रावण शक १९१२



संपादक

के. पं. क्षीरसागर

कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी

★ कार्यकारी संपादक ★

डॉ. वि. वा. सातपूरकर

शास्त्री, एम्.ए., पीएच्. डी., पंचांगकर्ता

—: कार्यालय :—

पोस्ट—शिरडी—४२३१०९, जिल्हा—अहमदनगर.

साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.

दूरध्वनि—४१२ २५ ६१



—वर्गणी—


वार्षिक— रु. १०· परदेशीय रु. ११५ तहहयात— रु. ३००

(टपाल खर्चासहित)

किरकोळ अंक— रु. २



या मासिकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही




# श्री साईलीला

वर्ष ६९ | ऑगष्ट १९९० | अंक

श्रावण शालिवाहन शक १९१२

शिवशक ३१७, विक्रमसंवत् २०४६

हिजरी १४११ फसली १३५९-६०


## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | रघुनाथ-सावित्री साईनाथ भजनमाला | – |
| २. | सद्विचार | – |
| ३. | संपादकीय | – |
| ४. | गुरुपौर्णिमा सोहळा, शिरडी | – सौ. प्रविणा कांबळी |
| ५. | सुखकर्ता-दुःखहर्ता | – |
| ६. | बहिरा जातवेद याची भागवत-दशमस्कंधावरील आद्य मराठी टीका | – डॉ. द. गं. कोपरकर |
| ७. | राजा मनाचा | – श्री. रामदास पगारे |
| ८. | साई-कृष्ण | – फकीर |
| ९. | साईभक्तांचे अनुभव | – श्री. श. बा. पटवर्धन |
| १०. | श्री साईंचे सत्य चरित्र, अध्याय ७ वा | – श्री. मु. ब. निंबाळकर |
| ११. | विष्णुसहस्त्रनाम | – |
| १२. | ॐ (ओंकार) | – वैद्यराज भाऊसाहेब कुळकर्णी |
| १३. | श्रीसाई गाथामृत–राधाकृष्णमाई | – |
| १४. | वर्षा ऋतु–आहार विहार | – वैद्य किरण पां. भावे |
| १५. | महिना विशेष | – |



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

११६

कां रे इच्छितोसी परा अनहित। बिघडाया नीत कारण तें॥
दुसऱ्याचे दोषें काय पोट भरे। जन्माचें मातेरें करिसी बा॥
निर्वैर ठेविजे आपुलें मानस। पहा श्वासोच्छ्वास शुद्ध येती॥
देहाचे देउळी वसे आत्माराम। वाचे सांईनाम नित्य ठेवी॥

११७

भजनप्रसंगी राही मना स्थिर। ध्याई गुरुवर सांईनाथ॥
सांगणें तयांचें प्रेमळ भक्तांसी। "चिंतावें मानसी नित्य मज॥
पडल्या प्रसंगा मारा मज हांक। पुरवीन भाक तुमची मी"॥
वाढियेलें ताट भाविकां पक्वान्न। दासासि कोरान्न देई बापा॥

११८

आहे तुझी सत्ता मज दीनावरी। पाव लवकरी गुरुदेवा॥
काढुनियां दोष माझिये अंगीचे। नाम देई वाचे प्रेमें गाया॥
उदार दयाळ जगा हितकारी। रोष मजवरी इतुका कां॥
नको नको आतां अंतरू मजला। चुकसी ब्रीदाला आपुल्या त्या॥
कार्यभाग करीं अगा मायबापा। तुझ्याविण हांका कोणा मारूं॥
गरीब खोडयाळ तुझें मी लेकरूं। छाये कल्पतरू बैसलोंसें॥

## सद्विचार

इन्द्रं वर्धन्तो अप्तुरः कृण्वन्तो विश्वमार्यम्।
अपघ्नन्तो अराव्णः ।।

–ऋग्वेद ९-६३-५

हे पर्जन्य देवता इन्द्रा, वनश्री नटवून सर्वांचे कल्याण कर व शत्रूंचा नाश कर.

संपादकीय



# जन्माष्टमी



आपण मंगलाचरणाच्या परंपरेचा शोध घेत आहोत. अर्थात श्रावण महिना आल्याने त्याचा प्रासंगिक विचार करणे क्रमप्राप्त आहे. तेव्हां मंगलाचरण थोडे बाजूला ठेवून श्रावण महिन्याकडे वळू या. भारतीय कालगणनाही रवि-चंद्राच्या गतीवर व ऋतूंवर आधारित आहे. दिवस, महिना व वर्ष हे सर्व ऋतुचक्रावर अवलंबून आहे. प्रारंभ चैत्रात म्हणजे वसंत ऋतूत-प्रसन्न वातावरणांत जेव्हां निसर्ग नवीन रूप धारण करीत असतो त्यावेळी उन्हाळा संपवून पावसाळा आषाढात तर तो कांहींसा स्थिरावतो श्रावणात. आषाढातील पहिल्या दिवसाने कविकुलगुरु कालिदासाला मेघदूताची स्फूर्ती दिली तर श्रावणाच्या जलधारांनीं बालकवी ठोमऱ्यांना स्फूर्ती दिली. 'आषाढस्य प्रथम दिवसे...' हे संस्कृत भाषेच्या अभ्यासकास व रसिकांना वेडे करते तर 'श्रावणमासी हर्ष मानसी...' हे बालकवींचे बोल आबालवृद्धांना वेड लावते. प्राचीनकाळीं निसर्गाकडे आकृष्ट असलेल्या ऋषींनी या कुंद वातावरणात रुद्राची स्तुती केली आहे. त्याच्यावर घनांनी अभिषेकाची संततधार धरलेली आहे. ही निसर्गप्रक्रीया अनंत काळ चालत आलेली आहे व पुढेही चालणार आहे. मानव त्याच्या वृत्तीला अशा प्रसंगांने निसर्गाबरोबर पुन:पुन्हा उजळा देत असतो. श्रावणातले संसृतीचे प्रगटीकरण सर्वांनाच हर्षभरित व कांहींसे गंभीर बनवते. वसंताचा उत्साह व शरदाची हुडहुडी या वातावरणांत नसते तर शान्त व धीरगंभीर अशा पावसाळी वातावरणात हा श्रावण येत असतो. अशा प्रसंगांत तशाच पार्श्वभूमीच्या सणांची योजना आमच्या पूर्वजांनी केलेली आहे. तसे आम्ही भारतीय उत्सवप्रिय. दर महिन्यात कोणता ना कोणता उत्सव, सण, समारंभ आहेच. या उत्सवप्रियतेबद्दल आपण नंतर विचार करू नाहीतर श्रावण संपून जाईल व सण साजरे करायचे राहून जाईल.

**श्रावण मासी**

श्रावणातल्या पावसाचा लपंडाव चाललेला असतो. एकदम येणार, भुरभुरणार व अदृश्य होणार. त्यामुळें श्रावणातले सर्व सण असेच बैठ्या प्रमाणांत चालणारे आहेत. तसे श्रावणातले सर्व वार पूजनाचे. रविवारी आदित्याची म्हणजे सूर्याची पूजा, सोमवारी शंकराची, मंगळवारी गौरीची, बुधवारी बुधाची (बुद्धीची), गुरुवारी

बृहस्पतीची, शुक्रवारी जिवत्यांची तर शनिवारी मारुति, पिंपळ यांची. या महिन्यांत नागपंचमी, रक्षाबंधन, पोळा व जन्माष्टमी हे राष्ट्रीय सणही येतात. नागपंचमी व पोळा हे शेतकरी बंधूंचे सण तर रक्षाबंधनात बहिणीची पाठवण व खवळलेला समुद्र शांत होण्याची प्रार्थना. परंतु या सर्वात महत्त्वाचा राष्ट्रीय सण म्हणून जन्माष्टमीला महत्त्व आहे. या दिवशी मध्यरात्री भगवान श्रीकृष्णाचा जन्म झाला. आम्ही देवांच्या जयंत्या व सत्पुरुषांच्या पुण्यतिथ्या साजऱ्या करतो. वास्तविक कृष्णाचा जन्म हा एकदाच झाला व तो निजधामासही गेला तरी आम्ही भारतीय त्याचा फक्त जन्मोत्सव दरवर्षी उत्साहाने साजरा करतो हा काय प्रकार आहे?

## जन्माष्टमी

श्रीकृष्ण भगवान हे देव; अवतार घेऊन या दिवशी आले. वस्तुतः ईश्वर हा जन्म कसा घेतो हा मुख्य प्रश्न नाहीं कां? परमेश्वर हा मूळचा अजन्मा, अविनाशी व स्वयंभू असतांना तो जन्म घेतो म्हणजे वेडगळपणाचे लक्षण आहे असे नक्कीच विचक्षणास वाटणार. बरें अवतार तरी एकच झाला कां? नाहीं, तर दहा अवतार विष्णुचे प्रसिद्ध आहेत. त्यातले राम, कृष्ण, नरसिंह, परशुराम तर सुप्रसिद्ध आहेत. या व्यतिरिक्त इतर देवतांनीही अवतार घेतलेले आहेत. याला ईश्वराभिमानी असे उत्तर कदाचित देतील कीं या जयंत्या ईश्वराच्या नसून अवतारांच्या आहेत. त्यावर प्रतिप्रश्न असा उपस्थित होईल कीं भक्त ईश्वराला भजतो ते अवताराला की त्या माध्यमांतून ईश्वराला? जन्माष्टमीला कृष्णाचा जन्म वा रामनवमीला रामजन्म हे जसें आम्हाला माहीत आहेत तसे रामाने शरयू नदीत देहत्याग केल्याचीं व श्रीकृष्ण निजधामाला गेल्याची कथा वा तिथी आम्हास माहीत नाहीं काय? व्यासांनीं अवतारसमाप्तीच्या कथाही त्या त्या ग्रंथांत नमूद केलेल्या आहेत व आम्हालाही त्या ठाऊक आहेत. मग आम्ही देवांच्या फक्त जयन्त्याच कां साजऱ्या करतो?

या प्रश्नाचे मार्मिक उत्तर आपणास कै. डॉ. पारनेरकर महाराजांच्या उद्गारांत मिळते. ते म्हणतात –

"मानवाच्या जीवनांत ईश्वराचा जन्म झाला हे तो अजन्मा असूनदेखील जेवढे खरें आहे तेव्हढेच तो मूळचा अविनाशी मानवाच्या जीवनातही अविनाशीच असल्याकारणामुळे आम्ही ईश्वराचा जन्म मानवाच्या जीवनांत कसा झाला या प्रश्नाचे महत्त्व विसरून जाऊ नये तर तो कसा झाला याचे महत्त्व नीट समजाऊन घेण्यासाठींच त्याच्या अवतारांच्या जयंती मोठ्या भक्तिभावानें साजऱ्या करीत असतो."

('परिसरात' – पृष्ठ १३३)

ईश्वर हा माणसाच्या जीवनात केव्हां आला हे आपणास आज माहीत नाही व तो कशाकरिता आला हेही आम्ही मूलतः लक्षात घेत नाहीं. आदिमानवापासून

मानवाचा इतिहास पाहिला तर मानवानेच आपल्या जीवनात ईश्वराची स्थापना जाणवेल व ही जाण यावी म्हणूनच आपल्याकडे देवांच्या जयंत्यांचे महत्त्व आहे. त्या प्रतिवर्षी साजऱ्या करण्याचा पायंडाही पाडून दिलेला आहे.

या कृष्णावताराचे वैशिष्टच आगळे आहे. इतर सर्व अवतारांपेक्षा हा अवतार व परिपूर्ण आहे. पहिले तीन अवतार मानवेतर जीवसृष्टीतले तर चौथा अर्धा व अर्धा सिंह. वामन बुटका तर परशुरामाला शस्त्र खाली ठेवायला फुरसत प्रभु रामचंद्रांच्या वाट्याला १४ वर्षे वनवास व पुन्हा सीतेचा त्याग करावा. या सर्व अवतारात भगवंताला यथार्थ जीवन दाखविता आलेले नाहीं. ती कृष्णावतारांत भरून निघाली. येथे दैत्यांचा बीमोड आहे, राज्यवैभव आहे, आहे तसेच मानवजातीच्या कल्याणासाठीं भगवद्गीतापण सांगितली आहे. कृष्णाच्या बालपणींच्या लीला अवर्णनीय आहेत. सर्व साधुसंतांनी यावर अभंग, पदे रचलेली आहेत. संत तुलसीदास, कबीर, सूरदास, ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, नामदेव, जनाबाई, मीराबाई, कृष्णचैतन्य इत्यादी असंख्य साधुसंतांनीं कृष्णभक्ती व बाळलीला वर्णन केल्या आहेत. एवढेच कशाला, खुद्द व्यासांची अवस्था त्यांना अस्वस्थ करायला लागली होती. चारी वेदांची पुनर्रचना, उपनिषदे, महाभारत, पुराणे इत्यादि प्रचंड ग्रंथसंपदा करून देखिल त्यांचे अंतःकरण शांत झाले नाहीं. त्या अस्वस्थतेतून बाहेर येण्याकरितां त्यांनीं अखेर कृष्णचरित्राचे भागवतरूपाने गायन केले तेव्हां त्यांना कृतकृत्यता वाटली व चिरशांती मिळाली. महाभारत हा धर्म व नीतीचे समर तर श्रीमद्भागवत हे भक्तिरसात बुडालेले व्यासांचे अमर वाङ्मय.

या बाळलीलांनी सर्व साधु-संतांचे लक्ष वेधून घेण्याचे कारण मानवी जीवन चढ-उतार, सुख-दुःखे, जयापजय यांनी भरलेले आहे. त्याला जीवनाचा निरागस आनंद फक्त बालपणातच मिळतो. त्या आनंदाला सीमा नाहीत, हेतू नाही तर तो केवळ निर्भेळ आनंद असतो. हा आनंद जर माणसाला मिळवायचा असेल तर त्याने भगवंताच्या बालक्रीडेशी समरस व्हायला पाहिजे हा संतांचा अट्टाहास आहे. जन्माष्टमी उत्सवाची समाप्ति काल्यात आहेत. सर्व गोपसवंगडी कृष्ण एकत्र आणतो. सर्वांचे अन्न एकत्र करून सर्वजण ते आनंदात खातात हा आनंदसोहळा अवर्णनीय आहे. त्या आनंदाची प्रचीति घेता यावी म्हणून जन्माष्टमीचा सण आमच्या परंपरेत आहे.

**- डॉ. वि. वा. सातपूरकर**
कार्यकारी संपादक

# - गुरुपौर्णिमा सोहळा, शिरडी -

गुरुपौर्णिमा हा शिर्डीच्या तीन उत्सवांपैकी एक महत्त्वाचा महोत्सव. यंदा गुरुपौर्णिमेचा महोत्सव दिनांक ६ जुलै ९० ते ८ जुलै ९० असा तीन दिवस भाविकांनी साजरा झाला. उत्सवाच्या आदल्या दिवशीं गुरुवारी दिनांक ५ जुलै रोजी दुपारी १.३० ते संध्याकाळीं ६.३० पर्यंत इच्छुक भक्तांची नावे अखंड श्री साईसत्चरित पारायणाकरितां नोंदविण्यात आली. रात्री त्या नावांची सोडत काढून ४८ भक्तांची नावे जाहीर करण्यात आली. श्री. प्र. रा. खोत, मंदिर प्रमुख यांनीं ती नावे सूचनाफलकावरही प्रसिद्ध करून पारायणकर्त्यांना वाचनाचे अनुक्रमांक दिले.

संध्याकाळीं पुण्याच्या भक्तमंडळींनीं आणलेल्या पालखीचे उत्सवसमितिप्रमुख व विश्वस्त श्री. गोपीनाथ कोते पाटील व विश्वस्त श्री. एस्. आर्. शिंदे यांनीं खंडोबाच्या मंदिराजवळ संस्थानतर्फे भव्य स्वागत केले. पालखी लेंडीबागेत भाविकांच्या दर्शनाकरितां ठेवलेली होती.

## - उत्सव प्रारंभ -



मिरवणूकीत पोथी धरलेले विश्वस्त श्री. देवकर व वीणा घेतलेले विश्वस्त श्री. शिंदे



फोटो घेतलेले विश्वस्त श्री. पृथ्वीराज आदिक व विश्वस्त श्री. मोतीराम पवार, शेजारी सौ. पवार व डावीकडे विश्वस्त श्री. राजीव कुलकर्णी

शुक्रवारी दिनांक ६ जुलै रोजी पहाटे मंगलमय वातावरणात गुरुपौर्णिमा महोत्सवाला प्रारंभ झाला. ५ वाजता मंदिर उघडण्यात आले व ५। वाजता काकड आरतीने उत्सवाची सुरुवात झाली. आरतीनंतर श्री बाबांच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधिमंदिरातून गुरुस्थानमार्गे द्वारकामाईत आली. मिरवणूकीत संस्थानचे विश्वस्त श्री. देवकर यांनीं पोथी धरली होती. विश्वस्त श्री. एस्. आर्. शिंदे यांनी वीणा धारण केली होती व श्री बाबांचा फोटो विश्वस्तद्वय श्री. पृथ्वीराज आदिक व श्री. मोतीराम पवार यांनीं धरला होता. साईनाम गजरांत ही मिरवणूक आल्यावर अखण्ड पारायणास सुरुवात झाली.

पहिल्या पाच अध्यायांचे वाचन विश्वस्तांनी केले व अन्य ४८ अध्यायांचे वाचन निवडलेल्या भक्तांनी केले. सकाळी ६॥ वाजता समाधिमंदिरात गायन वादनांत श्रींचे मंगलस्नान झाले. सकाळीं ८ वाजता श्रींना अर्पण केलेल्या पवित्र वस्त्रांच्या लिलावाचा जाहीर कार्यक्रम प्रसादरूपाने झाला. दपारी १२.३० वाजता आरती होऊन सर्व भक्त मंडळींना तीर्थप्रसाद देण्यात आला. २॥ वाजता समाधिमंदिरात नित्याचे अध्यायवाचन झाले. ३ ते ४ वाजेपर्यंत ह. भ. प. श्री. शेखगुरुजी, टाकळीमियां यांचे प्रवचन झाले. आपल्या अधिकारवाणीने श्री. शेखगुरुजींनी संतांचे दाखले देऊन कल्याणाची दिशा श्री बाबांना साक्षीला ठेवून दिली. श्रोते श्री. शेखगुरुजींच्या

प्रवचनामुळें भारावले होते. प्रवचनाच्या कार्यक्रमानंतर औरंगाबादचे सुप्रसिद्ध प्राध्यापक श्री. राजदेरकर यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. आपल्या रसाळ वाणीने व भक्तीसंगीताने त्यांनी कीर्तनात बहार आणली. आपल्या शैलीने प्राध्यापकांनी भक्तांना मंत्रमुग्ध केले. सायंकाळी ७ वाजता धूपारती झाली. ७।। वाजता सुप्रसिद्ध गायक श्री. जयवंत कुलकर्णी यांनी आपल्या साथीदारांसह गायनाचा कार्यक्रम सादर केला. त्यांच्या कन्येने (कु. किशोरी कुलकर्णी) अतिशय सुंदर 'जोगवा' सादर केला. भक्तांनी या कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

रात्री ९। वाजता श्रींच्या पालखीची द्वारकामाईतून अतिशय उत्साहात व साईगजरात मिरवणूक निघाली. चावडीवरून शिरडी नगरांत फेरी करून रात्री ११ वाजता मंदिरात परत आली. रात्रौ शेजारती होऊन त्या दिवशींचा कार्यक्रम संपला. अखण्ड पारायण द्वारकामाईत चालू होते.

## - गुरुपौर्णिमा -



अध्यक्षा डॉ. लेखा पाठक समाधीस पुष्पार्पण करीत असून त्यांच्याशेजारी त्यांच्या मातोश्री व उजवीकडे विश्वस्त श्री. गोपिनाथ कोते पाटील

शनिवार दिनांक ७ जुलै हा उत्सवाचा मुख्य दिवस. समाधिमंदिर उघडण्यापूर्वीपासूनच भाविकांची प्रचंड रांग लागलेली होती. पहाटेच्या पवित्र वातावरणात काकड आरती झाली. ६ वाजतां श्री साईसत्चरिताचे अखण्ड पारायण सुरू झाले. द्वारकामाईतून ग्रंथराजाची मिरवणूक निघून ती गुरुस्थानमार्गे समाधिमंदिरात आली. भाविकांच्या उत्साहाने व गर्दीने हा छोटासा मार्गही मोठा झाला. श्रींच्या अभिषेकाचा सोहळाही तोपर्यंत सुरू झाला होता. व्यवस्थापन मंडळाच्या अध्यक्षा सौ. लेखा पाठक यांनीं स्वहस्ते श्रींना पुष्पांजली वाहिली.


दर्शनार्थी भक्तांची अलोट गर्दी झालेली होती. कोठेच जागा शिल्लक नव्हती. असंख्य भक्त आतुरतेने व भाविकतेने बाबांच्या दर्शनाची वाट पहात होते. दुपारीं नैवेद्य प्रसाद व माध्यान्ह आरती झाली. दुपारी नित्याच्या अध्यायवाचनाचा कार्यक्रम झाल्यावर ह. भ. प. प्रा. राजदेरकर यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम सुरू झाला. पौर्णिमेचा दिवस व भाविकांची प्रचंड गर्दी यामुळे कीर्तनालाही रंग आला. सायंकाळीं धूपारती झाली. रात्रीं ९ वाजता विद्युतदीपांनीं अतिशय आकर्षक सजविलेल्या रथाची मिरवणूक निघाली. वाजत-गाजत, उत्साहात गावातून मिरवणूक परत येईपर्यंत १२ वाजले. भाविकांच्या गर्दीने त्यावेळीं उच्चांक गाठला होता. पौर्णिमेनिमित्ताने मंदिर दर्शनासाठीं रात्रभर खुले होते. त्यातच निरनिराळया भाविक कलाकारांचे श्रींपुढें सेवाकार्यक्रम सुरू झाले. ते संपायला रविवारची सकाळ उजाडली. ठिकठिकाणच्या कलाकारांनीं भजन, गायनाने श्रींपुढें हजेरी लावली. मंदिरात दर्शनार्थींची रीघ होतीच. ती कार्यक्रमांमुळें हळूहळू सरकत होती.

## - उत्सव सांगता -

समाधिमंदिर दर्शनासाठीं रात्रभर उघडेच होते व विविध नामवंत कलाकारांचीं सेवा चाललेली असतांनाच सकाळीं ६ वाजता नित्याच्या अभिषेकाला सुरूवात झाली. उत्सवाचा समारोपाचा दिवस असल्यानें गुरुस्थानी परंपरेप्रमाणे रुद्राभिषेक करण्यात आला. सकाळीं १०.३० वाजता भाविकांच्या उपस्थितीत ह. भ. प. प्रा. राजदेरकर यांचे काल्याचे कीर्तन सुरू झाले. गोपाळकाला व दहिहंडी हा आबालवृद्धांचा आवडता कार्यक्रम कीर्तनात झाला. १२.३० वाजता माध्यान्ह आरती झाली. दुपारी नित्याचे अध्यायवाचन झाले. संध्याकाळीं धूपारतीनंतर नियोजित कार्यक्रमाऐवजीं कोपरगावच्या अनंत संगीत विद्यालयाचे श्री. अनंतराव आढाव व श्री. अनंत पांचाळ यांच्या सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम झाला. रात्री १० वाजता शेजारती होऊन तीन दिवस चाललेला गुरुपौर्णिमेचा आनंदसोहळा संपला.



गायनाचा कार्यक्रम करताना श्री. जयवंत कुलकर्णी



जोगवा सादर करताना कु. किशोरी कुलकर्णी

उत्सवाला भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती. व्यवस्थापन मंडळाच्या अध्यक्षा
ौ. लेखा पाठक या जातीने कार्यक्रमांना उपस्थित होत्या. तसेंच विश्वस्त श्री. एस

शिंदे, श्री. खांबेकर, श्री. देवकर, श्री. शेळके पाटील, श्री. पवार, श्री. आदिक, कुलकर्णी, श्री. नरोडे पाटील, श्री. पी. बी. बोरावके, ॲड. धोरडे, श्री. ए. पाटील, श्री. हिरे, श्री. म्हस्के, श्री. जयकर यांनीं विविध कार्यक्रमांत जातीने घेतला. उत्सवसमितिप्रमुख श्री. कोते पाटील, विश्वस्त यांनी उत्तम व्यवस्थापन असंख्य भाविकांनीं हा उत्सव पार पडण्यास मदत केली. संस्थानने भोजन, स, इत्यादी सर्व व्यवस्था चोख ठेवली होती.

**- सौ. प्रविणा कांबळी,**
मानद सहाय्यक कार्यकारी संपादिका

(उत्सवातील छायाचित्रे द्वारा साईभक्त भोलानाथ समेळ)

## ''श्री साईलीला'' सभासदांना निवेदन

शिरडीचे श्री साईबाबा हे भारतीयांच्या व परदेशीयांच्या धर्मनिरपेक्षतेचे प्रतीक असून ला आगळया तीर्थक्षेत्राचे स्वरुप प्राप्त झालेले आहे. साईभक्तांना सर्वतऱ्हेच्या सोई करुन देण्याकरिता संस्थान प्रयत्नशील आहे. श्री साईबाबांचा संदेश सर्वदूर ण्यासाठी ''श्री साईलीला'' हे मासिक आम्ही प्रत्येक महिन्याला प्रसिध्द करीत असतो.

साईभक्तांना अधिक चांगल्या प्रकारची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी हे ''श्री ला'' मासिक प्रत्येक दोन महिन्यांनंतर द्वैमासिक स्वरुपात प्रकाशित करायचे आमच्या र्य आहे. ह्या नव्या योजनेनुसार ''श्री साईलीला'' मोठया आकारात व आकर्षक त प्रसिध्द होईल. त्यात बाबांच्या कार्याबरोबरच धर्म, तत्वज्ञान, भक्ती, योग, सामाजिक इत्यादी विषयांवर मान्यवर लेखकांचे लेख प्रसिध्द करण्यात येतील. ह्या नवीन योजनेचे आदरणीय वाचकभक्त स्वागत करतील अशी आशा आहे.

**- कार्यकारी संपादक**

# सुखकर्ता-दुःखहर्ता



कोणत्याही मंगल कार्याचा प्रारंभ करताना श्री गणरायाला वंदन केले जा आरतीच्या प्रथमारंभी तू सुखकर्ता तू दुःखहर्ता म्हणून संबोधिले जाते. गणपती बुद्धीचे तसेच सर्वगुणसंपन्न दैवत आहे. म्हणूनच श्री गणेशाला ‘‘गणाधीश सर्व गुणांचा असे म्हटले जाते. तो जसा प्रेममय, कृपाळू, दयासिंधू आहे, तसाच तो अज्ञान हरण करणारा, चिंता, क्लेश, दारिद्र्य, दुःख दूर करणारा, मनोरथ पूर्ण करणार ऋद्धि-सिद्धींचा नायक आहे. श्री गजाननाच्याबाबतीत एकवीस अंकाला फार महत्त्वा स्थान आहे. गणपतीची एकवीस प्रमुख नावे व स्थाने जशी प्रसिद्ध आहेत, त्याचप्रमा ह्या गौरीपुत्राच्या पूजेच्यावेळी एकवीस दूर्वा वाहिल्या जातात. ही एकवीस दू वाहण्याची जी प्रथा आहे, त्याची कथा अशी–अनलासूर ह्या आक्राळ-विक्राळ राक्षसाच्या डोळ्यांतून अग्नी बाहेर पडत होता आणि त्या अग्नीच्या प्रखर ज्वाळांमुळ पृथ्वीतलावर एकच हाहाकार उडाला, सर्व काही भस्मसात होऊ लागले, धरणी क पावू लागली. देवही त्याच्या भीतीने थरथर कापू लागले, वाट फुटेल तिकडे सैरावै पळू लागले. अनलासूरानेही त्यांची पाठ काढणे काही सोडले नाही, तो त्यांच्या हा


मागेच लागला. भयकंपित झालेल्या देवांनी सरतेशेवटी श्री गणरायाचे मनोभावे स्मरण केले. तत्क्षणी श्री गणराय देवांच्या सहाय्याला बालक रूपात धावून आले त्यांनी अनलासूराला अक्षरश: भक्ष्यच केले. अनलासूराला पार गिळल्यामुळे गणरायाच्या अंगात दाह निर्माण झाला, त्यांच्या देहाची आग आग होऊ लागली. दाह शांत करण्यासाठी अनेक देवतांनी नानाविध वस्तू श्री गणरायाला अर्पण केल्या. काही केल्या तो दाह थांबेना. अखेरीस ८८ सहस्त्र ऋषी-मुनीं एकत्र आले प्रत्येकाने एकवीस दुर्वांची एक जुडी अश्या ८८ सहस्त्र जुडया श्री गणरायाच्या वर अर्पण केल्या. तेव्हा कुठे श्री गणरायाच्या अंगातील दाह कमी झाला.

श्री गणरायाला वक्रतुंड, महाकाय, एकदंत, श्री लंबोदर, चिंतामणी अशा तरी नावांनी संबोधिले जाते.

लोकमान्य टिळकांनी सर्व जाती-धर्माच्या लोकांनी एकत्र येऊन सामंजस्यपणे रांची देव-धेव करण्यासाठी घरोघरी स्थापना होणाऱ्या गणपतीला सार्वजनिक रूप दिले व आज आपण पाहतच आहोत की सर्व जाती-धर्मातील, विविध थरांतील क उत्साहाने सार्वजनिक गणेशोत्सवात सहभागी होत असतात.

छपरावर चढायचे झाल्यास शिडी, बांबू, जिना, इत्यादी नाना उपायांनी चढता येते. त्याचप्रमाणे एका परमेश्वराजवळ जाण्याचे अनेक उपाय आहेत. प्रत्येक धर्म म्हणजे असला एक एक उपाय.

- रामकृष्ण-वाक्सुधा



# बहिरा जातवेद याची
# भागवत-दशमस्कंधावरील आद्य मराठी टीका

-डॉ. द. गं. कोपरकर
पुणे.

श्रीमद् भागवत पुराण हा विष्णु-कृष्ण-भक्तांचा एक प्रधान धर्मग्रंथ. भागवत तथा वारकरी संप्रदायातील भाविक संतांनाही तो परम आदरणीय. भागवतातही दशमस्कंध महत्त्वाचा, कारण त्यात कृष्णाच्या लीला आणि अद्भुत चरित्र आहे. मराठी संतांनी भागवत-दशमाच्या विवरणासाठी टीकाग्रंथ लिहिले. पण संपूर्ण दशमस्कंधावर मराठी ओवीबद्ध टीका लिहिण्याचा पहिला मान बहिरा पिसा, बहिरा जातवेद, तथा वहिरंभट या संतकवीचा. नेवाशाजवळील घोगरगाव येथे राहणारा हा कवी एक मार्च १२५२ इसवी चे खग्रास सूर्यग्रहण चक्षुर्वै सत्यं वर्णन करतो. यावरून तो श्रीज्ञानदेवांच्यापेक्षा सुमारे ५० वर्षांनी ज्येष्ठ ठरतो. दशम स्कंधात ३९४४ संस्कृत श्लोक आहेत. तर त्यांवर स्पष्टीकरण म्हणून बहिरा जातवेद २५७०८ रसाळ ओव्या रचतो. यावरून त्याने भक्तिभावाने कृष्णचरित्रात किती भर घातली असेल याची कल्पना यावी. कवीची भाषाशैली रंजक आहे आणि भाविकांनी या ग्रंथाचे श्रीकृष्णाष्टमीच्या निमित्ताने सप्ताह-पठन करावे इतका तो सुबोध आहे.

नमुना म्हणून या ग्रंथातील तीन उतारे येथे देत आहे.

## १. तो कैसा विसरों गा कृष्णु।

कंसवधानंतर उग्रसेन महाराजांना श्रीकृष्णाने बंधमुक्त केले व त्यांना मथुरेच्या गादीवर राज्याभिषेक केला. त्यानंतर कृष्णवियोगाने व्याकुळ झालेल्या मातापित्यांचे आणि गोपगोपींचे सांत्वन करण्यासाठी व त्यांना उपदेश करण्यासाठी भगवान श्रीकृष्ण आपला एकांत भक्त जो उद्धव त्याला गोकुळ-वृंदावनात पाठवितात. गोपींना कृष्णवियोग असह्य झालेला असतो. आपल्या भाववाही ओव्यात त्या बाळकृष्णाच्या आठवणी सांगतात–

उद्धवा हे यमुना दिसे। मनीं उल्हाळे[1] गा बैसे।
सोवळेपण इच्याऐसें। तो कैसा विसरों गा कृष्णु॥४७-४८५॥
आणि देखों गायींतें। त्यांसि पांचारिजे श्रीकृष्णनाथें।
विळचा[2] ये सांगातें। तो कैसा विसरों गा कृष्णु॥४८६॥

हे गोपाळ गायी आणिती। सांजे वेणु वो वाजविती।
कर्णीं पडे ते गा[३] श्रुती। तो कैसा विसरों श्रीकृष्णु॥४८७॥
हे सुरंग गे मोहरी[३]। श्रीकृष्ण इसी चाळें[४] धरी।
मिठी घातली गे अधरीं। तो कैसा विसरों गा श्रीकृष्णु॥४८८॥
तया श्रीकृष्णाचा पांवा गे खुंटीसी। हा आतां गे न बोले आमसीं।
जो मिळे श्रीकृष्णअधरासी। तो श्रीकृष्ण कैसा विसरों वो॥४८९॥
पैल हे मस्तकींची वेंठी[५]। मयोरपत्राची गे गोमटी।
ते देखोनियां दृष्टी। तो कैसा विसरों वो॥४९०॥
पैल उभी गे डांग। उघडेंचि जिचें सर्वांग।
करीं मिरवे चांग। तो कैसा विसरों कृष्णु॥४९१॥
पैल वो ळाणीवरिले[६] जाडी[७]। तिची कांरवाटी चौघडी।
डांग टेंकूनियां देव्हर्डी[८]। तो कैसा विसरुं कृष्णु॥४९२॥
पैल खुंटीसी ठेविलीं। जें मोटेचीं कुरुंधनें-जाळीं[९]।
ते देखों वो नेत्रकमळीं। तो कैसा विसरों श्रीकृष्णु॥४९३॥
अगे या गगनाकडे दृष्टी जाय। नीळिमेचा[१०] आभासु होय।
तंव तो आठवतु आहे। तो कैसा विसरों कृष्णु॥४९४॥
तंव आड पावे मेघु। तत्काळ आठवे श्रीरंगु।
सरला विस्मरणभोगु। तो कैसा विसरों कृष्णु॥४९५॥
अंगीं आदळतां पवनु। तंव स्मरणयुक्त श्रीकृष्णु।
तदाकार होय तनु। तो कैसा विसरों कृष्णु॥४९६॥
सूर्य सोमु तारांगणें। विजु अग्नि दीपपणें।
यें इतुकीं तेजें देती स्मरणें। तो कैसा विसरों कृष्णु॥४९७॥
नदी सरोवर पुष्करणी। निर्झर उदकें वृंदावनीं।
तें साध्य होती स्मरणीं। तो कैसा विसरों कृष्णु॥४९८॥
इतुकीं गे स्मरणकारकें। म्हणौनियां चालों अधोमुखें।
तंव ये पृथ्वीवरी पाउल देखे। तो कैसा विसरों कृष्णु॥४९९॥
अगे पाहाणें आइकणें। स्पर्शणें जें बोलणें।
तें सांडुनियां तटस्त असणें। तऱ्हीं न विसरवे कृष्णु॥५००॥
अगा प्रभु उद्धवा। स्मरणाचा माळवें[११] यावा।
श्रीकृष्णविस्मरण होय जीवा। तैं वियोगदुःख सरे गा॥५०१॥

१. कल्पना, विचाराची ऊर्मी २. वेळेवर ३. पुंगी ४. साथ ५. मुगुट

६. खुंटी ७. घोंगडी ८. तिरकी ९. शिदोरी, शिंके १०. निळा रंग
११. आगमन न होणे

## २. जय जय प्रतापमल्ला।

श्रीकृष्ण आपल्या १६१०८ पत्न्यांबरोबर कसा नांदू शकतो या कुतूहलाने नारदमुनी अस्वस्थ झाले. सर्व पत्न्यांना स्वतंत्र प्रासाद होते. नारद प्रत्येक प्रासादात डोकावून पाहू लागला. त्याला दिसले की श्रीकृष्ण प्रत्येक पत्नीबरोबर होता आणि गृहस्थधर्माच्या जबाबदारीने एक एक सांसारिक कार्य करीत होता. एका प्रासादात बंदिजन त्याच्या अचुंबित पराक्रमाची चरित्रे गात होते. तो ती ऐकण्यासाठी थबकला.

(पुढील ओव्या भागवत १०.६९.२६ या श्लोकावरच्या. त्या संस्कृत श्लोकात भगवान श्रीकृष्णाच्या प्रशस्तीचा उल्लेखही नाही. अर्थात् बहिरा जातवेदाची ही काव्यमय नवनिर्मिती आहे.)

तें राजद्वारीं बंदीजन। करिताती प्रतापवर्णन।
जयजय जगजीवन। अद्भुत चरित्र तुझें॥६९.१५५॥
ते बंदिजन वर्णिति कैसें। तें नारदु ऐकतुसे।
ते स्तविती ऐसें। जयजय प्रतापमल्ला॥१५६॥
बचकेसम दिसे भानु। तैसा देखिला श्रीकृष्णु।
हे तृणावर्तमर्दनु। जयजय प्रतापमल्ला॥१५७॥
हा वच्छकु भ्रांत जाला। श्रीकृष्णद्वेषें प्राणासि मुकला।
तेहीं वच्छपाळ मानिला। जय जय प्रतापमल्ला॥१५८॥
अघासुर नेणेचि तुतें। त्या सांडविलें प्राणातें।
तुवां भ्रांत केलें ब्रह्मयातें। जय जय प्रतापमल्ला॥१५९॥
इंद्रासि लागलें पिसें। मग शिला-धारीं वर्षे।
तो गोकुळपाळकु नेणे ऐसें। जय जय प्रतापमल्ला॥१६०॥
उदका नासिलें दर्पे। यमुनेडोहींचेनि सर्पे।
तो बाहेरीं घातला भूतकृपें। जय जय प्रतापमल्ला॥१६१॥
विष-अग्नीपासुनी। राखिसी आपुलीं म्हणौनी।
त्या सर्पापोटींचें काढुनी। जय जय प्रतापमल्ला॥१६२॥
हा शंखचूड आणि केशी। अरिष्ट आणि या व्योमासी।
तयां यमपंथु दाविसी। जय जय प्रतापमल्ला॥१६३॥

कुवलयापीड कुंजरु। मुष्टिकु आणि चाणुरु।
सळ तोसळ कुडु वीरु। मारिले प्रतापमल्लें॥१६४॥
जय जय कंसयवन घातका। जय जय मागधत्रासका।
भौमगण-अंतका। जय जय प्रतापमल्ला॥१६५॥
जय पौंड्रक विध्वंसना। जय काशीपति-निधना।
जय जय सुदक्षण-नाशना। प्रतापमल्ला॥१६६॥
ऐसे वानिती बंदिजन। मग नारद निघाला तेथुन।

## ३. आनंदु रे आनंदु।

बहिरा जातवेद फार भावनाप्रधान दिसतो. आपण नामसंकीर्तन घरच्या घरी रू शकतो, ते सुखाचे, फुकाचे, आयते, सोपे व तारक कसे हे तर तो सविस्तर गतोच, पण गुरुकृपेने आपल्या हातून या प्रचंड ग्रंथाची समाप्ती झाली यामुळे त्याला नंदीआनंद होतो. या ग्रंथाच्या पठनाने आबालपंडितांच्या सर्वच इंद्रियांवर आनंदाचा र्व होतो हे सांगताना, या आनंदाने आपण सर्वांसह श्रीकृष्णनाम घेत नाचावे, पळ्या वाजवाव्या, हात व मस्तक डोलवावे असे त्याला वाटते. हा गलितवेद्यान्तर—आनंदाचा उन्मादच. 'तुम्ही हा आनंद लुटा. जो हे करणार नाही, करंटा!'—

आतां बहिरा जातवेदु। म्हणे आनंदु रे आनंदु।
गीतीं गा रे गोविंदु। अहिर्णिसीं॥९०.२३२॥
परिसा हो आबालपंडित। आनंद भरिलें ये पेलतें।
तेव्हां सर्व इंद्रियां दावित। आपुलें रूप॥२३३॥
मग मूढ अथवा ज्ञानी। नृत्य करावें वाटे मनीं।
गायन उमटे वदनीं। जाणे तैसें॥२३४॥
हस्तु-मस्तक डोलत। छंदें चिपोळिया वात।
तेव्हां नामकीर्तन फावत। गोविंदाचें रे बापा॥२३५॥
ऐसें सुखाचें आणि फुकाचें। आइतें घ्या पां लुटीचें।
यासी प्रतिबंधकपण कोण्हाचें। न चले. येथें॥२३६॥
आतां तुम्हीचि वंचाल। जरी आळसा बिढार द्याल।
तंव प्रपंचगोंवीं जाल। अंतरैल गोविंदु॥२३७॥
अहो निजैल्या अथवा बैसल्या। हें कृष्णनाम उच्चारिल्या।
मग तें रूप आठविल्या। मना बुद्धीसी॥२३८॥

रूप ठसावें बुद्धीसी। बुद्धी सांडी स्ववृत्तीसी।
ते मिळौनि आत्मयासीं। सहजपणीं असे॥२३९॥
ऐसें उपरवांया[२] (न) जावें। आपुले स्वगृहीं नांदावें।
हें तेणें गुरुदेवें। मज दाविली वाट॥२४०॥

असा भैरवीचा समारोप आहे.

१. पेलणे—पूर येणे. २. कारणाशिवाय.

## राजा मनाचा

गोदा किनारी
शिर्डी नगरी
साई मुरारी
भेटी सत्वरी॥१॥

क्षण सौख्याचे
दंव भक्तीचे
ते विरायचे
धरली सबुरी॥२॥

भक्तां पाठी
हा जगजेठी
अभंग ओठी
गा घरो घरी॥३॥

उन सावली
जीवनी आली
साई माऊली
सदा कृपा करी॥४॥

भाव मनाचा
ध्यास भक्तीचा
कळी काळाचा
धाक न अंतरी॥५॥

- श्री. रामदास गजमल पगारे
नवापूर, धुळे.

# साई-कृष्ण





महाभारतात युद्धाच्या ऐन समरप्रसंगी अर्जुनाचे मन आप्त-संबंधितांना शत्रूच्या ठिकाणी पाहून जेव्हा दुःखाने विचलित झाले, तेव्हा भगवान श्रीकृष्णांनी सर्वांच्या ठिकाणी "मी"च भरून राहिलो आहे, हे दाखविण्यासाठी त्याला विश्वरूपदर्शन घडविले. त्याचप्रमाणे श्री साईबाबांनी सर्वत्र "मी"च व्यापून राहिलो आहे, हे दाखविण्यासाठी दासगणूंना विठ्ठलाच्या रूपात दर्शन दिले, अनेक भक्तांना त्यांच्या त्यांच्या दैवतांच्या रूपात दर्शन दिले, कित्येक भक्तांच्या बिकट प्रसंगी विविध मानवी रूपात धावत जाऊन त्यांची संकटे निवारण केली.

अनासक्ती हा भगवान श्रीकृष्णांच्या जीवन-चरित्राचा केंद्रबिंदू आहे, तसाच तो श्री साईबाबांच्या जीवन-चरित्राचाही विशेष आहे. आपल्या दुःखाचे मूळ कारण आसक्ती आहे. म्हणून कोणतीही आसक्ती न ठेवता कर्म करीत राहणे, ही जी शिकवण श्रीमद्भगवद्गीतेतून आपल्याला मिळते, तसाच संदेश आपल्याला श्री साईसत्चरिताद्वारे मिळतो. श्री साईसत्चरितात तर आपण पाहतोच की श्री साईबाबांनी भक्तांना धनाच्या आसक्तीपासून दूर ठेवण्यासाठी वारंवार त्यांच्याकडे पैशांची मागणी केली व लागलीच ते पैसे त्यांनी अन्य भक्तांना दिले. कर्माप्रमाणेच ज्ञान व भक्तीचा स्रोत जसा भगवान श्रीकृष्णांच्या जीवन-चरित्रात दिसतो, तसाच तो श्री साईबाबांच्या